सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
**कृषि विभाग**
**नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प**
**३० अर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई ४०० ००५**

दूरध्वनी क्र. ०२२-२२१६३३५१/५२ ई-मेल : pmu@mahapocra.gov.in

NDKSP-२२०१९(२१)/१९/२०२५-DBT दिनांक: २९/१२/२०२५

**प्रति,**

**विभागीय कृषि सहसंचालक,**
**(प्रकल्पांतर्गत सर्व)**

**विषय:-** नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा-२ अंतर्गत मोका तपासणीच्या वेळी मूळ देयके तपासून प्रमाणित करणेबाबत...

**संदर्भ:-** १. कृषि व पदुम विभागाकडील शासन निर्णय क्र. नादेकृ-४६२२/प्र.क्र.९४/८-अे, दि.३०/०६/२०२३
२. कृषि व पदुम विभागाकडील शासन निर्णय क्र. नादेकृ-४६२२/प्र.क्र.९४/८-अे, दि.१४/१०/२०२४

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा-२ ची अंमलबजावणी सुरु करण्यात आलेली आहे. प्रकल्पांतर्गत वैयक्तिक लाभार्थी व शेतकरी गट/शेतकरी उत्पादक कंपनी यांना विविध हवामान अनुकूल तंत्रज्ञानाचा अवलंब करणेसाठी अर्थसहाय्य दिले जाते. त्याबाबत घटक निहाय सविस्तर मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

प्रकल्पांतर्गत वैयक्तिक लाभार्थी व शेतकरी गट/शेतकरी उत्पादक कंपनी यांना प्रकल्पाच्या DBT प्रणालीद्वारे लाभ दिला जातो. पूर्वसंमती नंतर लाभार्थीकडून सदर घटकाचे काम पूर्ण करून देयके DBT प्रणालीद्वारे अपलोड केली जातात. सदर अपलोड केलेल्या देयकांच्या मूळ प्रतीची पडताळणी संबंधित मोका तपासणी अधिकारी यांनी तपासणी वेळी करणे आवश्यक आहे.

लाभार्थ्याने खरेदी केलेल्या घटकांची मूळ देयके मोका तपासणीच्या वेळी लाभार्थ्याकडून उपलब्ध करून घ्यावीत. खरेदी केलेले साहित्य मार्गदर्शक सूचनेनुसार योग्य असल्याची खात्री करावी. तदनंतर सदर देयकावर खालीलप्रमाणे शिक्का मारून त्यातील माहिती परिपूर्ण भरावी व सदर प्रमाणित केलेल्या देयकाची प्रत तपासणी अधिकारी यांनी त्यांच्या लॉगिन वरून तपासणी अहवालासोबत अपलोड करणे आवश्यक आहे. तसेच डेस्क ५ व ६ वरील अनुदान अदायगीची शिफारस करणाऱ्या अधिकाऱ्यांनी सदर बाबीची खातरजमा करावी..

> **मी, लाभार्थ्याने DBT पोर्टलवर अपलोड केलेल्या देयकाच्या मूळ प्रतीची पडताळणी केली आहे. तसेच खरेदी साहित्य मार्गदर्शक सूचनेनुसार योग्य असल्याची खात्री केली आहे. करिता सदरचे देयक प्रमाणित करण्यात येत आहे.**
> **तपासणी अधिकाऱ्याचे नाव व पदनाम :** -------------------------------------------
> -------------------------------------------
> **तपासणीचा दिनांक :** --------/--------/---------------
> **स्वाक्षरी :**-------------------------------------------

उपविभागीय कृषि अधिकारी यांनी वरील नमुन्यानुसार शिक्के तयार करून मोका तपासणी अधिकाऱ्यांना त्वरित उपलब्ध करून द्यावयाचे आहेत. शिक्के तयार करण्यासाठीचा खर्च प्रकल्पांतर्गत उपलब्ध निधीतून भागवावयाचा आहे. जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांनी वरीलप्रमाणे सूचना तात्काळ अंमलात येतील याबाबत दक्षता घ्यावी.

(परिमल सिंह)
प्रकल्प संचालक
नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प, मुंबई

**Signed by Parimal Singh**
**Date: 29-12-2025 22:38:17**

प्रत-१. जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी (प्रकल्पांतर्गत सर्व) यांना माहितीस्तव.
२. प्रकल्प संचालक, आत्मा (प्रकल्पांतर्गत सर्व) यांना माहितीस्तव.